॥ अंतरी पेटवू ज्ञानज्योत ॥
कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ,जळगाव
Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon
'A' Grade NAAC Re-accredited (4th Cycle)

# जनसंपर्क विभाग

जळगाव दि. २८ (प्रतिनिधी) : कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठात युवा व क्रीडा मंत्रालय, नवी दिल्ली, रा.से.यो. प्रादेशिक संचालनालय व रा.से.यो. विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने ३० नोव्हेंबर पासून राष्ट्रीय एकात्मता शिबीराला प्रारंभ होणार असून यामध्ये ११ राज्यातील एकूण २०० विद्यार्थी सहभागी होणार आहेत. या शिबीराची तयारी पूर्ण झाली आहे. हे शिबीर ६ डिसेंबर पर्यंत चालणार आहे.

गुरूवार दि. ३० नोव्हेंबर रोजी सायं. ४ वाजता या शिबीराचे उद्घाटन जिल्हाधिकारी आयुष प्रसाद यांच्या हस्ते होणार असून कुलगुरू प्रा. व्ही.एल. माहेश्वरी अध्यक्षस्थानी राहतील. यावेळी प्र- कुलगुरू प्रा. एस.टी. इंगळे, व्यवस्थापन परिषद सदस्य राजेंद्र नन्नवरे यांची उपस्थिती असणार आहे. विद्यापीठाच्या अधिसभा गृहात हा कार्यक्रम होणार आहे. विविध राज्यातील सामाजिक, सांस्कृतिक व खाद्य संस्कृती आदान प्रदान करणे तसेच एक भारत श्रेष्ठ भारत ही भावना जोपासण्याचे काम या राष्ट्रीय एकात्मता शिबीरातून होत असते. त्याचाच एक भाग म्हणून हे शिबीर विद्यापीठात होणार आहे. महाराष्ट्र, गुजरात, राजस्थान, केरळ, गोवा, मध्यप्रदेश, कर्नाटक, आसाम, तेलंगणा, ओरीसा आणि तामिळनाडू या राज्यातून एकूण २०० रा.से.यो. स्वयंसेवक या शिबीरात सहभागी होतील. याशिवाय १५ कार्यक्रम अधिकारी सहभागी होणार आहेत. एका राज्यातील पाच विद्यार्थी व पाच विद्यार्थिनी आणि महाराष्ट्राच्या अकृषी विद्यापीठातील विद्यार्थ्यांचा यात सहभाग असेल.

या शिबीरासाठी संयोजन समितीसह विविध १० समित्यांची स्थापना करण्यात आली आहे. १ डिसेंबर रोजी राजेंद्र नन्नवरे यांचे पंचप्रण या विषयावर व्याख्यान होईल. २ डिसेंबरला जयदीप पाटील हे राष्ट्रनिर्मितीत युवकांचा सहभाग, ४ डिसेंबर रोजी यजुर्वेंद्र महाजन हे युवकांचे भविष्य युवकांच्या हातात आणि ५ डिसेंबर रोजी प्रकाश पाठक हे राष्ट्रीय एकात्मता या विषयावर संवाद साधणार आहेत. दररोज दिवसभराच्या या शिबीरात योगा, सांस्कृतिक कार्यक्रम, स्पर्धा आणि गटचर्चा असे नियोजन करण्यात आले आहे. ६ डिसेंबर रोजी सकाळी ११.०० वाजता जळगाव जिल्हा पोलिस अधिक्षक एम. राजकुमार व कुलगुरू प्रा.व्ही.एल. माहेश्वरी यांच्या मुख्य उपस्थितीत शिबीराचा समारोप होईल. अशी माहिती रा.से.यो.चे विभागीय संचालक अजय शिंदे, कुलसचिव डॉ. विनोद पाटील आणि रा.से.यो. संचालक डॉ. सचिन नांद्रे यांनी दिली.

## बातमी क्र. २

जळगाव दि. २८ (प्रतिनिधी) : महात्मा फुले यांच्या स्मृतीदिना निमित्त कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या विचारधारा प्रशाळा अंतर्गत महात्मा फुले अध्ययन व संशोधन केंद्राच्यावतीने डॉ. जयेंद्र लेकुरवाळे यांचे व्याख्यान झाले. तर सामाजिक शास्त्र प्रशाळेत प्रा. सुनील निंभोरे यांचे व्याख्यान झाले.

डॉ. लेकुरवाळे यांनी आपल्या भाषणात महापुरूषांना कोणत्याही चोकटीत न बांधता त्यांचा विचारांचा वारसा पुढे न्यावा अशी अपेक्षा व्यक्त केली. अध्यक्षीय समारोप कुलसचिव डॉ. विनोद पाटील यांनी केला. प्रशाळेचे प्रभारी संचाल प्रा. म.सु. पगारे यांची यावेळी उपस्थिती होती. विभागप्रमुख डॉ. पवित्रा पाटील यांनी प्रास्ताविक केले. गौरव हरताळे यांनी सूत्र संचालन केले. प्रा. बाळासाहेब सुर्यवंशी यांनी आभार मानले.

सामाजिकशास्त्र प्रशाळेतील व्याख्यानात प्रा. सुनील निंभोरे यांनी सांगितले की, महात्मा फुले यांनी शेतकरी, कामगार आणि कष्टकरी वर्गाच्या उद्धारासाठी क्रांतीकारी कार्य केले. ते कार्य आजही समाजाला प्रेरणा देणारे आहे. अध्यक्षीय भाषणात प्रशाळेचे प्रभारी संचालक डॉ. अजय पाटील यांनी महात्मा फुले यांनी सामाजिक विषमता व अंधश्रध्दा याविरूध्द आवाज उठवून मानवतावाद पेरण्याचे काम केले असे सांगितले. डॉ. उमेश गोगडीया यावेळी उपस्थित होते. डॉ. विजय घोरपडे यांनी सूत्र संचालन केले.

..........................................................................................................................................

जा.क्र.:-कबचौउमवि/१६/ई-मेल/बातमी/२०२३ — दिनांक: २८ नोव्हेंबर, २०२३

प्रति,

मा.संपादक/प्रतिनिधी,

महोदय,

वरील बातमी आपल्या लोकप्रिय दैनिकात प्रसिध्द करावी, ही विनंती.

आपला विश्वासू

(डॉ.सुनील पाटील)
जनसंपर्क अधिकारी